# प्रेस नोट

दिनांक - २२/०४/२०२४

**कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई च्या पथकाने खुनाच्या गुन्हयातील अनोळखी आरोपीस १० तासाच्या आत जेरबंद केलेबाबत.....**

| | |
|---|---|
| **कक्ष** | कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई. |
| **गु.र.क्र. व कलम** | घाटकोपर पोलीस ठाणे गु.र.क्र.३५०/२०२४, कलम ३०२ भादंवि सह १३५, ३७(१)(अ) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ (सी.सी.टि.एन.एस.क्र.५१८/२०२४) |
| **गुन्हा घडला, दिनांक व वेळ** | दिनांक २१/०४/२०२४ रोजी १७.४५ वाजताच्या दरम्यान. |
| **गुन्हा दाखल दिनांक** | दिनांक २१/०४/२०२४ रोजी २३.३३ वाजता. |
| **घटनास्थळ** | सुर्यमुखी साईबाबा मंदीराजवळ, डिजीक्यु कॉम्प्लेक्स समोर, घाटकोपर प., मुंबई. |
| **अटक आरोपीतांची संख्या** | १ पुरूष ( वय-१९ वर्षे) |

**थोडक्यात हकिगत** - कक्ष-७, गु.प्र.शा., गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई पोलीस ठाणेच्या हद्दीत वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी  कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचा मुलगा, वय-१६ वर्षे याचा कोणत्यातरी धारदार शस्त्राने वार करून गंभिर प्राणघातक जखमा करून खुन केल्याने गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा घडल्यानंतर गुन्हयाचा समांतर तपास तात्काळ कक्ष कार्यालयाकडून सुरू करण्यात आला. कक्ष-७ कार्यालयाचे ०४ पथके तयार करण्यात आली. पथकाने सर्वप्रथम घटनास्थळी भेट देवून घटनास्थळी व आजूबाजूच्या परीसरात सविस्तर चौकशी करून मयत व खून करणारा अनोळखी इसम यांची नावे निष्पन्न केली. त्यानंतर तांत्रिक तपास तसेच गुप्तबातमीदारांकडून माहिती प्राप्त करण्यात येवून यांतील आरोपी हा दातिवली, दिवा, जि.ठाणे येथे लपून बसला असल्याबाबत खात्रिशीर माहिती प्राप्त झाली. सदर ठिकाणी कक्ष-७ च्या पथकाने जावून नमुद आरोपीस ताब्यात घेतले.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), शशी कुमार मिना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), विशाल ठाकूर, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पूर्व), चंद्रकांत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महेश तावडे, पो.नि.आत्माजी सावंत, पो.उ.नि.रामदास कदम, पो.उ.नि. स्वप्निल काळे, पो.उ.नि. महेश शेलार, पो.उ.नि.नामदेव परबळकर, स.फौ.३०९४१/तानाजी उबाळे, पो.हवा.३२८०७/संतोष गुरव, पो.हवा.९६०५५२/शशिकांत कांबळे, पो.हवा.क्र.९६०६३३/अजय बल्लाळ, पो.ह.क्र.००८२०/विनोद पांडे, पो.हवा.क्र.०३४६७/सचिन गलांडे, पो.शि.क्र.०८०८७२/विकास होनमाने, पो.शि.क्र. ०९०४६४/महेश सावंत, पो.हवा.चा.००६८८/राजाराम कदम यांनी पार पाडली आहे.

***** D-1/     /2024 *****